उल्हासनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/३६१/२०२६ दि. २७/०८/२०२६

"वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

ज्याअर्थी, ठाणे वाहतुक विभागाचे कार्यक्षेत्रात उल्हासनगर वाहतुक उपविभाग हददीत शनिमंदिर चौक – ई.एस.आय.एस हॉस्पिटल – ४० कोटी परिसर – बाबा गुरूनानक चौक या परिसरात मोठया प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते, शनिमंदिर चौक – ई.एस.आय.एस. हॉस्पिटल – ४० कोटी परिसर – बाबा गुरूनानक चौक रोडवर दोन्ही बाजुला मोठया प्रमाणात दुचाकी चारचाकी वाहने रस्त्यावर अस्ताव्यस्त उभी करतात. त्यामुळे सदर परिसरात मोठया प्रमाणात मोठया नियमित वाहतुक कोडी होत असते. त्यामुळे सदर ठिकाणाची वाहतुक सुरळित व सुरक्षित राहावी वाहतूक कोडी होवु नये, याकरिता शनिमंदिर चौक – ई.एस.आय.एस हॉस्पिटल – ४० कोटी परिसर – बाबा गुरूनानक चौक या रोडवर पी–१, पी–२ पार्किंग करण्याकरीता अधिसुचना निर्गमीत करणे करिता जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे :–

अ.क्र.	पार्कींगचे ठिकाण	पार्कींगचा प्रकार	पार्कींगचे अंतर	वेळ
१	शनिमंदिर चौक – ई.एस.आय.एस हॉस्पिटल – ४० कोटी परिसर – बाबा गुरूनानक चौक	पी– १	३०० मीटर	सकळी १०:०० वा. ते रात्रौ २२:०० वा. पावेतो
२	बाबा गुरूनानक चौक – ४० कोटी परिसर – ई.एस. आय.एस. हॉस्पिटल – शनिमंदिर चौक	पी– २	३०० मीटर	सकळी १०:०० वा. ते रात्रौ २२:०० वा. पावेतो

वर नमूद ठिकाणी **पी १, पी २ पार्कींग व्यवस्थे** बाबत अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर च

मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.

मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.

प्रत कार्यवाहीसाठी :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण

विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी

पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

प्रत:— पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, उल्हासनगर वाहतूक शाखा.

२/— म.न.पा. उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.